# प्रेस नोट

दिनांक १४/१२/२०१७

## प्रशांतीनगर येथे महीलेवर हल्ला करुन घरफोडी करणारा अवघ्या आठ दिवसात जेरबंद !
## कुख्यात घरफोडया किशोर तेजराव वायाळ अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात !
## जिल्हयात ८ घरफोडया केल्याची कबुली व ८,०४,९००/- रुपयाचा ऐवज जप्त !

श्री. रामनाथ पोकळे, पोलीस अधीक्षक जालना यांनी श्री. राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक, स्थागुशा, जालना यांना प्रशांतीनगर येथिल दिवसा हल्ला करुन घरफोडी व ईतर मालाविरुध्दच्या गुन्हयाकडे लक्ष घालून गुन्हयास प्रतिबंध घालुन घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशीत केले होते.

श्री गौर यांनी जालना शहरात व जिल्यामध्ये घडलेल्या घरफोडयाचे अवलोकन करुन प्रत्यक्ष घटणास्थळावर भेटी दिल्या आहे. आजपर्यंतच्या अनुभवातुन गौर यांनी बऱ्याच गुन्हयाची कार्यप्रणाली सारखीच असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार किशोर तेजराव वायाळ रा. मेरा बु. ता. चिखली यानेच बरेच गुन्हे केले असावेत असा अंदाज बांधला. त्यादृष्टीने खबऱ्यांना सुचना दिल्या. किशोर वायाळ याने ७-८ गुन्हे केल्याची खबऱ्यामार्फतीने खात्रीशिर माहिती मिळाली. त्याप्रमाणे गौर यांनी किशोर वायाळवर खबऱ्यामार्फतीने पाळत ठेवली होती. किशोर वायाळ हा जालना शहरात चोरी करण्याच्या उद्येशाने आला असता त्यास गौर यांनी स्थागुशाचे पथकासह ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्याने जालना शहरात व सेवली येथे १ अशा एकुण ८ घरफोडया केल्याची कबुली दिली असुन याच बरोबर सोलापुर जिल्हयामध्ये सुध्दा नुकतीच घरफोडी केल्याची कबुली दिली असुन गुन्हयामध्ये चोरलेल्या मुद्येमालापैकी ८,०४,९००/- रुपयाच्या सोन्या-चांदी व नगदी असा मुद्येमाल काढुन दिल्याने गुन्हयाचे तपास कामी जप्त केला आहे.

किशोर वायाळ हा गेल्या १५ वर्षापासुन घरफोडीचे गुन्हे करत आहे. त्याने आजपर्यंत जालना, औरंगाबाद, बुलढाणा, वाशीम, सोलापुर, बीड, जळगांव, अकोला, अमरावती, धुळे या महाराष्ट्रातील जिल्हयाबरोबर मध्यप्रदेश व गुजरात राज्यामध्ये सुध्दा घरफोडया केलेल्या आहेत. यास बऱ्हाणपुर (मध्यप्रदेश), फुलंब्री जि. औरंगाबाद, अंबड येथे प्रत्यक्ष दिवसा घरफोडी करीत असतांना लोकांनी पकडलेले असुन त्यास मारहाणसुध्दा झालेली आहे. किशोर वायाळ हा त्याचे घरी न झोपता इतरत्र कुठेही जागा बदलुन झोपत असे. व दिवसा घरफोडी करीत असे.

तसेच प्रशांतीनगर दत्तमंदिरा जवळ जालना येथे दिनांक ३०.११.२०१७ रोजी दिवसा महीलेवर हल्ला करुन घरफोडी झाली होती या पार्शभुमीवर सुध्दा गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न सुरु होता. किशोर वायाळ याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. किशोर तेजराव वायाळ हा मुख्य आरोपी आहे. त्याचा आणखी एक साथीदार असुन त्याचा शोध घेणे चालु आहे.

किशोर वायाळ हा पो. स्टे. कदीम जालना गुन्हयामध्ये अटक असुन पोलीस कस्टडीमध्ये आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधीक्षक, जालना यांच्या आदेशाने व श्री. गौर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोउपनि श्री. हनुमंत वारे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. रामनाथ पोकळे, पोलीस अधीक्षक, जालना व श्रीमती लता फड, अपर पोलीस अधीक्षक, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक, स्थागुशा, जालना, श्री. हनुमंत वारे, पोउपनि, स्थागुशा व स्थागुशाचे पोहेकॉ भालचंद्र गिरी, सॅम्युअल कांबळे, गोकुळसिंग कायटे, विनोद गडदे, समाधान तेलंग्रे, सचिन चौधरी, हिरामण फलटणकर, विलास चेके व चालक वसंत राठोड आणि महिला मंदा बनसोडे यांनी पार पाडली आहे.